खडक पोलीस स्टेशन पुणे
दिनांक – १५/०७/२०१७

प्रेसनोट

जबरी चोरी करणारे सराईत दोघे त्यांचे अल्पवयीन साथीदारासह जेरबंद चार गुन्हे उघड
भांडणे सोडविण्यासाठी गेलेल्या मध्यस्थास हत्याराने धमकावणारा तडीपार जेरबंद

१) दिनांक - १४/०७/२०१७ रोजी श्री चिमाराम पुर्खाराम जाखड, वय ३५ वर्ष, धंदा. सुतार, रा. अप्पर डेपो, पाण्याचे टाकीजवळ, ओम सुपर मार्केट वरती, पुणे. मुळ रा.- मु.पो - बागथल, तहसिल पोखरण जि - जेसलमेर राजस्थान यांनी घटनेबाबत तक्रार दिलेली आहे ते सुतार काम करतात दि.१४/०७/२०१७ रोजी सकाळी १०/०० वा. चे सुमारास ते व त्यांचे मित्र जियाराम चौधरी सकाळी १०/४५ वा. चे सुमारास लाकडी गणपती शिवाजी रोड पुणे चे समोरुन पायीपायी जात असताना दोन अनोळखी इसम व त्यांचा अल्पवयीन साथीदार मुलगा याने त्यांना धरुन रस्त्याचे बाजुला बोळात नेले त्यातील एका इसमाने त्यांना चुपचाप रहा ओरडलास तर तुला मारुन टाकीन अशी धमकी दिली व अल्पवयीन मुलाने त्यांचे पॅन्टचे खिशातील पैशाचे पाकीट त्यातील रोख रक्कम पॅन कार्ड, आधार कार्ड, मतदान कार्ड, एटीएम कार्ड असा एक हजाराचा ऐवज जबरदस्तीने चोरुन नेला होता. त्याबाबत त्यांनी खडक पोलीस स्टेशन पुणे याठिकाणी तक्रार दिलेली आहे त्यांनी दिलेल्या वर्णनावरुन खडक पोलीस स्टेशन पुणे येथील अधिकारी व कर्मचारी यांनी विलंब न लावता तात्काळ गुन्हयाचा तपास केला जैन मंदीर चौक गुरुवार पेठ पुणे येथील दारुच्या दुकानाजवळ संशयीत इसम विशाल संजय लोहोकरे वय २६ रा - भाजी मंडई जवळ खडकवासला पुणे व महादेव राजाराम शिंदे वय - ३२ रा - मुपो - शिराळा ता – शिराळा जिल्हा – कोल्हापुर हल्ली स्वारगेट कॅनॉल लगत पुणे व त्यांचा अल्पवयील साथीदार मुलगा मिळुन आल्याने त्यांना ताब्यात घेण्यात आलेले आहे. त्यांचेकडे सखोल तपास करण्यात आलेला आहे व त्यांचे ताब्यातुन गुन्हयातील सर्व माल हस्तगत करण्यात आलेला आहे संशयीत दोघेजण सराईत गुन्हेगार आहेत अशाप्रकारे त्यांनी खडक पोलीस स्टेशन पुणे च्या हददीमध्ये चोरीचे आणखी तीन गुन्हे केल्याचे उघडकीस आलेले आहे त्यांचे ताब्यातुन रोख रक्कम,दुचाकी वाहनाच्या बॅटरी वगैरे असा एकुण चार हजार सातशे रुपयाचा माल हस्तगत करण्यात आलेला आहे. दोघेही पोलीस अभिलेखावरील सराईत गुन्हेगार आहे. महादेव शिंदे याचेविरुध्द यापुर्वी स्वारगेट पोलीस स्टेशन पुणे येथे दरोडयाची तयारी एक, चोरीचे तीन व खडक पोलीस स्टेशन पुणे येथे जुगाराची एक असे एकुण पाच गुन्हे तर विशाल लोहकरे याचेविरुध्द खडक पोलीस स्टेशन पुणे येथे विश्वासघात, फसवणुक केल्याचा एक व शांतताभंग केल्याबाबत एक असे दोन गुन्हे दाखल आहे.

२) दिनांक – ०७/०७/२०१७ रोजी रात्रौ २०/३० वाजता चुडामण चौक भवानी पेठ पुणे याठिकाणी श्री काहर जमीर सैय्यद वय – १९ रा – ७३५ भवानी पेठ पुणे हे त्यांचे मित्र निजाम शेख, साकलेन कुरेशी , अंजार खान यांचेशी गप्पा मारत उभे असताना पोलीस अभिलेखावरील अटटल व सध्या तडीपार असलेला गुन्हेगार बब्बन ऊर्फ अरबाज इक्बाल शेख रा - बच्चुअडडा भवानी पेठ पुणे हा तेथे आला व त्याने निजाम शेख यांना पकडुन विनाकारण शिवीगाळ करुन हाताने मारहाण केली त्यावेळी काहर सैय्यद हे भांडणे सोडविण्यास गेले त्या कारणावरुन आरोपीने त्यांना हाताने मारहाण केली व पालघनचा धाक दाखवुन जिवे ठार मारण्याची धमकी दिलेली आहे. त्याबाबत त्यांनी खडक पोलीस स्टेशन पुणे येथे तक्रार दिलेली आहे. आरोपी बब्बन ऊर्फ अरबाज इक्बाल शेख वय – १९ रा - बच्चुअडडा चुडामन चौक भवानी पेठ पुणे यास पोलीसांना मिळालेल्या माहीतीवरुन दिनांक – १४/०७/२०१७ रोजी पुना कॉलेज लष्कर पुणे याठिकाणी पकडण्यात आलेले आहे तो पोलीस अभिलेखावरील गुन्हेगार आहे त्याचेविरुध्द खडक पोलीस स्टेशन पुणे याठिकाणी जबरी चोरीचा एक, घर पेटवुन दिल्याचे दोन, दुखापतीचा एक, जिवे मारण्याची धमकी दिल्याबाबत एक असे एकुण पाच गुन्हे दाखल आहेत. परिमंडळ १ पुणे चे तत्कालीन पोलीस उप आयुक्त श्री सुधीर हिरेमठ यांनी त्यास जानेवारी २०१७ या महिण्यात पुणे शहर व जिल्हयातुन दोन वर्षाकरिता तडीपार केलेले आहे.

मा. श्रीमती अे. अेस. बारुळकर प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी सहावे न्यायालय पुणे यांचे न्यायालयात सर्व आरोपींना हजर केले असता त्यांची न्यायालयीन कोठडी रवानगी करण्यात आलेली आहे अल्पवयीन मुलास मा. अधिक्षक जिल्हा बाल न्याय मंडळ पुणे यांचे आदेशान्वये बाल सुधार गृह येथे ठेवण्यात आलेले आहे.

सदर कामगिरी परिमंडळ १ पुणे चे पोलीस उपायुक्त श्री. बसवराज तेली, शहर विभाग पुणे चे सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. बाजीराव मोहीते यांचे मार्गदर्शनाखाली खडक पोलीस स्टेशन पुणे चे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री राजेंद्र मोकाशी, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री संभाजी शिर्के, सहायक पोलीस निरीक्षक व्हि. डी. केसरकर व जे. सी. मुजावर, तपास पथकाचे पोलीस उपनिरीक्षक संजय गायकवाड व पोलीस कर्मचारी दिपक खेडकर, महेंद्र कोलते, विदयाधर गांगुर्डे, उमेश मानकर, विठठल पाटील, सचिन खाडे, अनिकेत बाबर यांनी पोलीस कर्मचारी केलेली आहे.